नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११८ Issue - 118 | वार - मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ Blow- Tuesday Date 22 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यात कोरडा दुष्काळ?; दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू

### तांत्रिक बाबींचे विश्लेषण सुरु; पीकस्थिती, जमिनीतील ओलावा, जलाशयांचा साठा आणि 'एनडीव्हीआय'ची माहिती तपासणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात पावसाने ओढ दिलेल्या विविध भागांमध्ये दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू झाली आहे. पावसाची तूट असलेल्या भागांमध्ये पहिला दुष्काळ ट्रिगर लागू झाल्यानंतर आता दुसरा ट्रिगर लागू करण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबींचे विश्लेषण सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यासाठी पीकस्थिती, जमिनीतील ओलावा, जलाशयांतील पाणीसाठा तसेच उपग्रहाद्वारे मिळणाऱ्या 'एनडीव्हीआय' (वनस्पती हिरवाई निर्देशांक) डेटाचा अभ्यास केला जाणार आहे.

राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये पावसाचा मोठा खंड पडला असून, काही भागांत ४० दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याचे प्रशासनाच्या आढाव्यात समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यस्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडून तालुकानिहाय परिस्थितीचा आढावा घेतला जात आहे. कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील ही समिती पावसाची सद्यस्थिती आणि अन्य दुष्काळ निर्देशकांचा अभ्यास करत आहे.

दुसऱ्या ट्रिगरसाठी पावसाच्या स्थितीबरोबरच प्रत्यक्ष शेतीवरील परिणाम तपासला जाणार आहे. पीकस्थिती किती गंभीर आहे, जमिनीतील ओलावा किती आहे, जलाशयांमध्ये उपलब्ध पाणीसाठा किती आहे, तसेच उपग्रहाच्या माध्यमातून वनस्पतींची स्थिती दर्शविणारा 'एनडीव्हीआय' डेटा काय सांगतो, याचे विश्लेषण करण्यात येणार आहे. दुष्काळाच्या दुसऱ्या टप्प्यातील मूल्यांकनात अशा प्रकारच्या कृषी, रिमोट सेन्सिंग, जमिनीतील ओलावा आणि जलविषयक निर्देशकांचा वापर केला जातो. कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील समितीकडून विविध



विभागांतील तालुक्यांची माहिती संकलित केली जात आहे. उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील तालुक्यांचा स्वतंत्र आढावा घेतल्यानंतर परिस्थितीनुसार यादी तयार केली जाणार आहे. या तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीचे निकष कितपत लागू होतात, याचा अभ्यास करून त्यासंदर्भातील सादरीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर केले जाणार असल्याची माहिती आहे.

या सादरीकरणानंतर दुष्काळाच्या संदर्भात अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुसऱ्या टप्प्यात नेमके किती तालुके आणि किती गावांचा समावेश होतो, याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, राज्य सरकारने यापूर्वीच दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन मदत व टंचाई निवारणाच्या उपाययोजनांची तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ ऑक्टोबरपासून दुष्काळी स्थितीचे पंचनामे सुरू करण्याचे निर्देश दिल्याचेही समोर आले आहे.

पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिकांवर परिणाम झाला असून, राज्यातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता पहिल्या ट्रिगरनंतर दुसऱ्या ट्रिगरच्या तांत्रिक मूल्यांकनातून कोणते तालुके दुष्काळाच्या निकषात येतात, याचा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

## महसूलमंत्री बावनकुळेंचे केंद्रीय सचिवांकडून कौतुक, 'आदर्श नोंदणी पॅटर्न' आता देशभरात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून अस्तित्वात आलेल्या मॉडेल नोंदणी कार्यालयांच्या उपयोगितेची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. पुणे येथे सुरू झालेले मॉडेल नोंदणी कार्यालय आता देशभर प्रारंभ करण्याचे निर्देश केंद्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज मंत्रालयाच्या भूमी संसाधन विभागाने दिले आहेत. विशेष म्हणजे, केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांनी अशी कार्यालये देशभर सुरू करण्यासाठी प्रत्येक कार्यालयासाठी ५० लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आल्याचे सांगितले.



केंद्रीय भू-संसाधन विभागाचे सचिव नरेंद्र भूषण यांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावित 'केंद्रीय नोंदणी विधेयक, २०२६' संदर्भात सर्व राज्यांच्या नोंदणी महानिरीक्षकांची व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला राज्याचे नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक रविंद्र बिनवडे व उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे उपस्थित होते. या बैठकीत प्रस्तावित विधेयकातील तरतुदी, संभाव्य परिणाम आणि राज्यस्तरावरील सुधारणांबाबत सविस्तर चर्चा करून राज्यांचे अभिप्राय व सूचना जाणून घेण्यात आल्या.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी व मुद्रांक विभागाने महसूलवाढीसोबतच नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवा देण्यासाठी विविध नाविन्यपूर्ण योजना यशस्वीपणे राबविले जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिल्यावर, सर्व राज्यांनी असे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत अशा सूचना करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्राच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने सुरू केलेल्या 'एक जिल्हा, एक नोंदणी', 'ई-प्रमाण', पासपोर्ट कार्यालयांच्या धर्तीवर उभारलेली 'आदर्श कार्यालये' आणि 'ई-नोंदणी' यांसारख्या गतिमान उपक्रमांचे केंद्रीय सचिवांनी विशेष कौतुक केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' संकल्पनेला गती देत, नागरिकांच्या सोयीसाठी भविष्यातही अधिक लोकाभिमुख आणि तंत्रज्ञानाधिष्ठित सेवा देण्यास आम्ही कटिबद्ध आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने पुणे येथे सुरू झालेल्या मॉडेल कार्यालयाची दखल केंद्राने घेतली. यातूनच या कार्यालयाची उपयोगात लक्षात येते, अशी प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.


## २५ जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : राज्यात पुन्हा एकदा पावसाने कमबॅक केलं आहे. मुंबईत पावसाच्या काही सरी बरसल्या. तर ठाण्यात जोरदार पाऊस पडला. अचानक आलेल्या पावसामुळे ठाणेकरांची चांगलीच तारांबळ उडाली. मुसळधार पावसामुळे ठाण्यातील सखल भागांमध्ये पाणी साचायला सुरुवात झाली. विशेष म्हणजे राज्यात सध्या गणेशोत्सवाचा उत्साह आहे. ठाण्यातही गणेशोत्सवामुळे नागरिकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे. असं असताना अचानक पाऊस आल्याने नागरिकांचा मोठा हिरमोड झाला. फक्त ठाणे शहर नाही तर कल्याण आणि डोंबिवली शहरांतही चांगलाच मुसळधार पाऊस पडला. कल्याण, डोंबिवली शहरांत गेल्या काही दिवसांपासून अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. कधी ढगाळ वातावरण, कधी ऊन ते कधी हलका पाऊस पडत होता. पण आज पावसाने चांगलीच बॅटिंग केली. दुपारी ३ नंतर शहरात मुसळधार पाऊस पडला. जवळपास तासभर ते दीड तास मुसळधार पाऊस पडल्यानंतर रात्री आठवाजेपर्यंत रिमझिम पाऊस सुरुच आहे.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, महाराष्ट्रातील बहुतांश भागात पावसाची शक्यता आहे. विशेष म्हणजे २२ सप्टेंबरसाठी राज्यातील २५ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारा वाहण्याची शक्यता आहे. तसेच तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे.

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, नाशिक, नाशिकचा घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट परिसर, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा, सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांसाठी २२ सप्टेंबरला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.



बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र

पश्चिम बंगालमध्ये कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. येत्या ४८ तासात हे कमी दाबाचे क्षेत्र आणखी तीव्र होणार आहे. त्याचा परिणाम वातावरणात होणार आहे. या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे २४ सप्टेंबरला ओडिशा आणि छत्तीसगडमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर २३ आणि २४ सप्टेंबरला आंध्र प्रदेशात पावसाची शक्यता आहे. या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे महाराष्ट्रात पाऊस येतो का? ते पाहणं आता महत्त्वाचं आहे.

दरम्यान, हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी देखील काही अंदाज वर्तवले आहेत. धाराशिव, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, परभणी, बीड, जालना, अहिल्यानगर, पुणे या जिल्ह्यांमध्ये २४ सप्टेंबरपर्यंत चांगला पाऊस पडेल. दररोज भाग बदलून पाऊस पडेल. हा निर्णायक पाऊस असणार आहे. या भागांमध्ये चार दिवसांत चांगला पाऊस पडणार आहे. हा पाऊस २४ सप्टेंबरपर्यंत आहे. यानंतर २ ते ४ ऑक्टोबर या काळात या भागांमध्ये चांगला पाऊस पडेल. तसेच पुणे, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये देखील चांगल्या पावसाची शक्यता आहे, असा अंदाज डख यांनी वर्तवला आहे.

यवतमाळ, नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली, बीड, अहिल्यानगर, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, धाराशिव, लातूर या जिल्ह्यांमध्ये २४ सप्टेंबरपर्यंत पावसाचा जोर चांगला राहणार आहे. तसेच १ ते ३ ऑक्टोबर दरम्यान येणाऱ्या पावसाचा जोर देखील याच भागात जास्त राहणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

सगळ्यात जास्त जोर जिथे अद्यापही पाऊस पडला नाही तिथे पाऊस पडणार आहे. या पावसात विजांचा कडकडाट जास्त राहील, अशीदेखील माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्राच्या बाजूचे राज्य तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये पावसाचा जोर जास्त राहणार आहे. २१ ते २३ सप्टेंबर कोल्हापूर पासून ते पालघर, पुणे, मुंबई, नाशिक, संगमनेर, अकोले, अहिल्यानगर या भागांमध्ये पाऊस असणार आहे, असं पंजाबराव डख म्हणाले आहेत.

टंचाई परिस्थितीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील पाणी, चारा व खरीप पिकांच्या स्थितीचा आढावा

पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन

## पुढील वर्षभर पिण्याचे पाणी उपलब्ध राहील, अशा पद्धतीने पाणी आरक्षणाचे नियोजन करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : एल निनोच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. सद्यस्थितीत खरीप हंगामातील सुमारे ८० ते ८५ टक्के पिकांचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. पुढील पंधरा दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास पिकांचे नुकसान आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन पुढील वर्षभर जिल्ह्यात पिण्याचे पाणी उपलब्ध राहील, अशा पद्धतीने पाणी आरक्षणाचे नियोजन करावे. याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागामार्फत शासनास सादर करावा, असे निर्देश राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

नियोजन समिती सभागृहात आयोजित टंचाई परिस्थितीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, महापौर विनायक कोंड्याल, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, महानगरपालिका आयुक्त सचिन ओंबासे, आमदार सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, राजू खरे, नारायण पाटील, अभिजीत पाटील, उजनी धरण व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता सुभवेन्द्र खांडेकर, भीमा कालवा व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता धीरज साळी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देऊन नियोजन

पालकमंत्री गोरे यांनी जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघु प्रकल्पांमधील पाणीसाठ्याची सद्यस्थिती जाणून घेतली. जलसंपदा विभाग व जिल्हा प्रशासनाने उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पिण्याच्या पाण्याचे दीर्घकालीन नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

सध्याची टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन लोकप्रतिनिधींनीही पाण्याच्या उपलब्धतेचा आढावा घेऊन सिंचनासाठी पाणी सोडण्याबाबत निर्णय घेताना पिण्याच्या पाण्याची गरज आणि उपलब्ध पाणीसाठा यांचा समतोल राखावा. शेतकरी व प्रशासन यांच्यात योग्य समन्वय ठेवावा. जलसंपदा विभागाने जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधील पाणीसाठ्याची सद्यस्थिती दर्शविणारा माहितीपत्रक अथवा चार्ट उपलब्ध करून द्यावा, असेही त्यांनी सांगितले.

टँकर मंजुरीसाठी ४८ तासांची कार्यवाही

टंचाईग्रस्त गावातून पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रस्तावाला ४८ तासांच्या आत मंजुरी मिळेल, याबाबत दक्षता घ्यावी. तहसीलदार व प्रांताधिकाऱ्यांनी टँकरबाबत गावनिहाय योग्य नियोजन करावे. जिल्हा परिषद स्तरावर टँकर व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व्यवस्था करून प्रत्येक टँकरच्या फेऱ्या, पाणीपुरवठा आणि खर्चाचा योग्य हिशोब ठेवावा, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

सद्यस्थितीत जिल्ह्यात ६८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. आगामी काळात पाऊस न झाल्यास दररोज आणखी गावांकडून टँकरची मागणी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनाने संभाव्य परिस्थितीचा विचार करून आधीच नियोजन करावे. टँकर सुरू करण्याबाबतची कार्यवाही वेळेत होते की नाही, याची जबाबदारी संबंधित प्रांताधिकाऱ्यांनी घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

पशुधनासाठी पाणी व चारा उपलब्धतेचे नियोजन

जिल्ह्यातील जनावरांसाठी आवश्यक पाणी व चारा उपलब्ध राहील, याचेही नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री गोरे यांनी दिल्या. यासाठी गटविकास अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा. तहसीलदार, प्रांताधिकारी व कृषी अधिकाऱ्यांनी टंचाईच्या अनुषंगाने सादर करावयाचे अहवाल वस्तुनिष्ठ व अचूक पद्धतीने सादर करावेत. दुष्काळसदृश परिस्थितीत एकही शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा २७ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध

जिल्ह्यात १८ लाखांपेक्षा अधिक पशुधन असून सुमारे २७ लाख मेट्रिक टन चारा उपलब्ध आहे. चारा पिकांच्या पेरणीसाठी ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, त्यापैकी प्रारंभी २ कोटी रुपयांच्या निधीतून चारा पिकांची पेरणी करण्यात आली आहे. मागील महिन्यात अतिरिक्त १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. पशुसंवर्धन विभागाने उपलब्ध चाऱ्याचे योग्य नियोजन करावे, असेही पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन व सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहनही पालकमंत्री गोरे यांनी केले.

सप्टेंबरपर्यंतच्या पाणीटंचाईचा आराखडा तयार

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान व पाणी उपलब्धतेबाबत माहिती दिली. एल निनोच्या प्रभावामुळे जिल्ह्यात सरासरीच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. उजनी धरण भरल्यानंतर उपलब्ध अतिरिक्त पाणी जिल्ह्यातील काही लघु व मध्यम प्रकल्पांमध्ये सोडण्यात आले आहे. सप्टेंबरपर्यंतच्या संभाव्य पाणीटंचाईचा आराखडा तयार करण्यात आला असून, त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. पाणी व चारा उपलब्धतेचे नियोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

उजनी धरणातील पाणीसाठ्याचा आढावा

उजनी धरण व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता सुभवेन्द्र खांडेकर यांनी उजनी धरणातील पाणीसाठ्याची सद्यस्थिती व सिंचन नियोजनाची माहिती दिली. उजनी धरणात सद्यस्थितीत सुमारे ९५ टक्के पाणीसाठा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच १५ ऑक्टोबरपर्यंत खरीप हंगामासाठी सिंचनाचे रोटेशन सुरू राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

लोकप्रतिनिधी यांच्या सूचना

बैठकीत लोकप्रतिनिधींनी पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी जलसंपदा विभागाने आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सूचना केल्या. जिल्ह्यातील भीमा व सीना नदीवरील सुमारे ९० कोल्हापुरी बंधाऱ्यांमधून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. या पाण्याचे योग्य नियोजन करून पुढील काळात अधिकाधिक पाणीसाठा उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची गरज लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली. टंचाईच्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची मागणी प्राप्त झाल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करून नागरिकांना वेळेत पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणीही लोकप्रतिनिधींनी केली.

## संपादकीय....

### पावसाची हुलकावणी

राज्यात पुन्हा एकदा पावसाने कमबॅक केलं आहे. मुंबईत पावसाच्या काही सरी बरसल्या. तर ठाण्यात जोरदार पाऊस पडला. अचानक आलेल्या पावसामुळे ठाणेकरांची चांगलीच तारांबळ उडाली. मुसळधार पावसामुळे ठाण्यातील सखल भागांमध्ये पाणी साचायला सुरुवात झाली. विशेष म्हणजे राज्यात सध्या गणेशोत्सवाचा उत्साह आहे. कल्याण, डोंबिवली शहरांत गेल्या काही दिवसांपासून अपेक्षित पाऊस पडताना दिसत नाही. कधी ढगाळ वातावरण, कधी ऊन ते कधी हलका पाऊस पडत होता. पण आज पावसाने चांगलीच बॅटिंग केली. दुपारी ३ नंतर शहरात मुसळधार पाऊस पडला. जवळपास तासभर ते दीड तास मुसळधार पाऊस पडल्यानंतर रात्री आठवाजेपर्यंत रिमझिम पाऊस सुरुच आहे. महाराष्ट्रातील बहुतांश भागात पावसाची शक्यता आहे. विशेष म्हणजे २२ सप्टेंबरसाठी राज्यातील २५ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात ३० ते ४० किमी प्रतितास वेगाने वारा वाहण्याची शक्यता आहे. तसेच तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, नाशिक, नाशिकचा घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट परिसर, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा, सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटीलः शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची प्रगती शक्य नाही!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२२ सप्टेंबर:कर्मवीर भाऊराव पाटील जयंती विशेष.)**

शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची प्रगती होवू शकणार नाही, हे ओळखून पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील अण्णा यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद, कमवा आणि शिका या मुलमंत्रातून तयार झालेल्या अनेक विद्यार्थ्यानी यशाची विविध शिखरे पादाक्रांत केली आहेत, ही ज्ञानवर्धक माहिती श्री एन.कृष्णकुमार यांच्या लेखातून वाचा... संपादक.

भाऊराव पाटील यांचा जन्म कुंभोज-कोल्हापूर येथे दि.२२ सप्टेंबर १८८७ रोजी झाला. त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. या संस्थेची महाराष्ट्रात २०१७ साली ४१ महाविद्यालये, ४३९ हायस्कुले, कॉलेजच्या मुलांसाठी २७ वसतीगृहे, १६० उच्च माध्यमिक विद्यालये, १७ शेती महाविद्यालये, ५ तंत्र विद्यालये, ५ इंग्रजी माध्यमाच्या शाळा, ८ डी. एड.महाविद्यालये, ४५ प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळा, शाळेल्या मुलांसाठी ६८ वसतिगृहे, ८ आश्रमशाळा, ५८ आयटीआय व इतर. एकूण संस्था ६७९, एकूण विद्यार्थी सुमारे साडेचार लाख व सेवक १६,९४८ आहेत. कार्मवीरजींचे लग्न त्यांच्या वयाच्या २५ व्या वर्षी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर झाले. त्यावेळी त्यांचे वय १२ वर्षे होते. त्यांचे माहेरचे नाव आदाक्का होते. त्यांचे माहेरचे आडनाव कुंभोज पाटील हे होते. ते एक प्रतिष्ठीत घराणे होते. लग्नात त्यांनी लक्ष्मीबाईना १२० तोळे सोन्याचे दागिने केले होते. शिक्षण सोडल्यानंतर कर्मवीर कोरेगावला आले. त्यावेळी लक्ष्मीबाई वहिनी या नावाने ओळखल्या जात. याचवेळी कर्मवीरांच्या जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. घरी पाहुणे आले असता लक्ष्मीबाईच्या समोर त्यांनी कर्मवीरांचा अपमान केला. तो भाऊरावांच्या जिव्हारी लागला. वहिनीचे डोळे भरले होते, भाऊरावांना त्या जेवायला वाढत होत्या. त्यांच्या डोळ्यातला थेंब भाऊरावांच्या ताटात पडला. कर्मवीर जेवत्या ताटावरून उठले. त्यांनी मनाशी निश्चय केला. ते तडक कोरेगाव ते सातारा पायी चालत आले. त्यावेळी त्यांना एक कल्पना सुचली शिकवण्या घेण्याची. मग त्यांनी शिकवणी वर्ग सुरू केले हळू-हळू मुले वाढत गेली. महिन्याला त्यांना ९० ते ९५ रुपये मिळू लागले. लक्ष्मीबाईना सातारा येथे आणले. साताऱ्यात भाऊरावांना अण्णा पाटील म्हणून आओळखू लागले.

शिक्षणाशिवाय बहुजन समाजाची प्रगती होवू शकणार नाही, हे ओळखून पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील अण्णा यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद, कमवा आणि शिका या मुलमंत्रातून तयार झालेल्या अनेक विद्यार्थ्यानी यशाची विविध शिखरे पादाक्रांत केली आहेत. संस्थेची उद्दिष्टे- कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्ह्यातील काले या गावी सत्यशोधक समाजाच्या मेळाव्यामध्ये बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्था या नावाने एक शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात यावी असा ठराव मांडला व तो एक मताने मंजूर झाला. दि.४ ऑक्टोबर १९१९ रोजी विजया दशमीच्या शुभ मुहूर्तावर काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. स्वतःच्या मालकीची जमीन करणाऱ्या शेतकऱ्यास रयत म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या प्रजेला रयत म्हणून संबोधित करत. त्यामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी स्थापन केलेल्या शैक्षणिक संस्थेला रयत शिक्षण संस्था हे नाव सार्थ वाटते. रयत शिक्षण संस्था ही कर्मवीर भाऊराव पाटील संस्थापित महाराष्ट्रातील एक शिक्षण संस्था होय. पुढील प्रमुख उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून रयत शिक्षण संस्थेने आपल्या शैक्षणिक कार्याला सुरुवात केली- बहुजन समाजामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करणे व ती वाढवणे, मागासलेल्या वर्गातील गरीब मुलांना मोफत शिक्षण देणे, निरनिराळ्या जातीधर्मातील विद्यार्थ्यांत प्रेमभाव निर्माण करणे, अयोग्य रूढींना फाटा देऊन खऱ्या विकासाचे वळण लावणे, एकीचे महत्त्व कृतीने पटवून देणे, सर्व मुले काटकसरी, स्वावलंबी, शीलवान व उत्साही बनवण्याचा प्रयत्न करणे, बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसारासाठी जरूर पडेल तेव्हा संस्थेचे कार्यक्षेत्र वाढवणे, कमवा आणि शिका. शिक्षणवेडे कर्मवीर भाऊराव पाटील यांचे दुःखद निधन दि.९ मे १९५९ रोजी झाले.

!! कर्मवीर भाऊराव पाटील जयंतीच्या पावन पर्वावर त्यांना व त्यांच्या अचाट कार्यकर्तृत्वास मानाचा लवून मुजरा !!

**– श्री एन.कृष्णकुमार से.नि. अध्यापक. गडचिरोली– ९६९९८३६७१७.**

# जो स्वत:च मन जिंकतो मनावर ताबा ठेवतो तोच खरं सुखी समाधानी जिवन जगतो हीच तथागत भगवान बुद्धांची शिकवण आहे : भदन्त धम्मसार थेरो




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : एक वेळस जग जिंकन सोप आहे.पण स्वतःच मन जिंकन खुप आवघड आहे.जो स्वतःच मन जिंकतो मनावर ताबा ठेवतो तोच खरं सुखी समाधानी जिवन जगतो. हीच तथागत भगवान बुध्दांची शिकवण आहे.तेंव्हा माणसाने नेहमी आपल्या मनावर ताबा ठेवला पाहिजे असे प्रतिपादन पुज्य भदन्त धम्मसार थेरो यनी वागदरी ता.तुळजापूर येथे बोलताना केले.

पंचशील बुध्द विहार समिती,भारतीय बौध्द महासभा ग्रामशाखा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी, बि.आर.तरुण मंडळ, व समस्त बौध्द बांधव वागदरी ता.तुळजापूर यांच्या वतीने, तक्षशीला व संघमित्रा बुध्द विहार किल्लारी ता.औसा येथिल पुज्य भदन्त धम्मसार थेरो यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली वागदरी येते वर्षावास निमित्त रविवार दि.२ सप्टेंबर २२६ रोजी एक दिवसीय अनापान ध्यान व धम्म संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराला मार्गदर्शन करताना भदन्त धम्मसार थेरो बोलत होते. पुढे बोलतान त्यानी ध्यानसाधना, तथागत गौतम बुद्ध यानी सांगतलेली दान पारिमिता दानाचे महात्व व मानवी जीवनाचे नितीमूल्य या विषयी सखोल मार्गदर्शन केले.

तर प्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून बोलतान प्रा.डी.डी.मस्के म्हणाले की, तथागत गौतम बुद्ध यानी दिलेल्या पंचशील तत्वाचे प्रत्येकानी काटेकोरपणे पालण केल्यास मनावर ताबा ठेवून सुखी समाधानी जिवन जगता येते. यावेळी रिपाइं (आठवले)चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, नळदुर्ग सर्कल प्रमुख राजेंद्र शिंदे यांचेही शुभेच्छापर भाषणे झाली. या निमित्ताने भदन्त धम्मसार थेरो यांचे भिमनगर वागदरी येथे आगमन होताच समस्त बौध्द बांधवाच्या वतीने फूलांचा वर्षाव करून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. प्रारंभी तथागत. गौतम बुध्द व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्य प्रतीमांचे पुजन पूज्य भदंत धम्मसार थेरो, प्रा.डी.डी. मस्के, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत शिंदे, माजी सरपंच नागनाथ बनसोडे, कमिटी अध्यक्ष महादेव वाघमारे, सचिव चंद्रकांत वाघमारे, उपाध्यक्ष दीपक वाघमारे यांच्या हस्ते पूजन करून अभिवादन करण्याआले. या नंतर भदन्त धम्मसार थेरो यानी उपस्थित सर्व उपासक उपासिकेना त्रिशरण पंचशिल दिले अर्थात सामुदायिक रित्या बुध्द वंदना घेऊन शिबिराला सुरवात करण्यात आली.या प्रसंगी येथिल जेष्ठ कार्यकर्ते कुंडलिक वाघमारे व कुटुंबीयांकडून पूज्य भदंत धम्मसार थेरो यांना चिवर दान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन रिपाइं(आठवले) चे जिल्हा सचिव एस.के.गायकवाड यानी केले.यावेळी रिपाइं (आठवले)चे जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब मस्के, जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी, युवा कार्यकर्ते प्रा.अशांक मस्के, महिला कार्यकर्त्या काशिबाई मस्के सह पंचशील बुद्ध विहार कमिटी वागररी, भारतीय बौद्ध महासभा ग्राम शाखा वागदरी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी व बि. आर.तरुण मंडळ वागदरी चे सर्व पदाधिकारी सदस्य, महिला कार्यकर्त्या, युवा कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जव्हार फाट्यावरील रेल्वे ब्रिजचा खोदलेला रस्ता तीन महिन्यांपासून जैसे थे; अपघाताची भीती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर प्रतिनिधी/दिनेश घनघाव : शहापूर तालुक्यातील कसारा घाट परिसरातून मोखाडा तालुक्याला जोडणाऱ्या जव्हार फाटा येथील रेल्वे ब्रिजजवळील रस्ता गेल्या जवळपास तीन महिन्यांपासून खोदून ठेवण्यात आला आहे. मात्र, अद्याप या कामाची योग्य प्रकारे दुरुस्ती किंवा सुरक्षित व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने नागरिक आणि प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी वाहने तसेच स्थानिक नागरिकांची ये-जा असते. रस्ता खोदून ठेवल्यामुळे दुचाकीस्वार आणि छोट्या कारचालकांना अरुंद व धोकादायक मार्गातून कसरत करत प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे, एवढी गंभीर परिस्थिती असतानाही संबंधित प्रशासनाचे या समस्येकडे अद्याप पुरेसे लक्ष गेलेले दिसत नाही. खोदलेल्या ठिकाणी पुरेशी सुरक्षा व्यवस्था, स्पष्ट सूचना फलक किंवा नागरिकांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक उपाययोजना नसल्याने प्रवासी आणि स्थानिक नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाने आणखी एखादी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने या ठिकाणाची पाहणी करून रस्त्याचे काम पूर्ण करावे आणि तोपर्यंत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

– दिनेश घनघाव
शहापूर प्रतिनिधी

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री यांना विविध मागण्याचे निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : धाराशिव जिल्हा तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन मजूर व असंघटीत कामगारांना त्वरित मदत मिळावी, या मागणीसाठी कळंब तहसीलदार यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तहसील चे नायब तहसीलदार भराडीया यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, या वर्षीचा खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. त्यामुळे कोणतेही पंचनामे न करता सरसकट सर्व शेतकऱ्यांना ५० हजार रुपये मदत जाहीर करावी. तसेच सर्व शेतमजूर, भूमिहीन शेतमजूर, असंघटीत कामगारांना प्रती कुटुंब ५० हजार रुपये मदत द्यावी. घरपट्टी, पाणीपट्टी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे.

शेतकरी कर्जमाफी दिल्याप्रमाणे मजुरांची विविध महामंडळांची कर्जे माफ करावीत. महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे महामंडळ, संत रोहिदास महामंडळ तसेच जिल्हा उद्योग (सी.एम.ई.जी.पी) या सर्व महामंडळांची कर्जे माफ करावीत. अंत्योदय योजनेतील धनदांडग्यांची नावे वगळून अपंग, विधवा, परितक्त्या या वर्गाला लाभ देऊन अन्नधान्य उपलब्ध करावे.

गायरान जमीन धारकांना दादासाहेब सबलीकरण योजनेअंतर्गत जमीन वाटप करून त्यांच्या नावे सातबारा व भोगवटादार म्हणून नोंद करावी. दुष्काळासाठी ज्या योजना आहेत त्या तातडीने राबवून गरीब, कष्टकरी, शेतकऱ्यांना मागेल त्याला काम या योजनेअंतर्गत काम द्यावे.

तालुक्यासाठी दुष्काळी आर्थिक मदत द्यावी, तसेच संजय गांधी, श्रावणबाळ,आदी योजनेचे मानधन गेल्या तिन महिन्यापासुन वेळेवर मिळत नाही तरी ते मानधन तात्काळ लाभधारकांना वाटप करावे आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत सदरील मागण्या मान्य न केल्यास कार्यालयासमोर लोकशाही पद्धतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर कळंब तालुकाध्यक्ष हनुमंत ढगे, जिल्हा निरीक्षक निवृत्ती हौसलमल,जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब ओव्हाळ,जिल्हा कार्याध्यक्ष महावीर गायकवाड,रा. काँ.बालाजी वाघमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# जय जवान माजी सैनिक सेवाभावी संस्थेचा तृतीय वर्धापन दिन थाटामाटात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सदानंद मल्टीपर्पज हॉल मिरज रोड, सांगोला येथे माजी सैनिक व त्यांच्या धर्मपत्नी, वीरमाता, वीरपत्नी यांच्या एकूण ५०० ते ६०० जणांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. प्रथम पाहुण्यांच्या हस्ते सरस्वती पूजन व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रगान म्हणण्यात आले आणि शहिदांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.या वर्धापन दिनास सांगोला तालुक्यातील वासुद-अकोला, मानेगाव ,जवळा,सोनंद, राजापूर, निजामपूर, पाचेगाव बुद्रुक, कोळे, हणमंतगाव, चिणके, कडलास घेरडी येथील आजी-माजी सैनिक संघटना तसेच तालुक्यातील सर्व गावातून माजी सैनिक भरपूर आले होते तसेच सोलापूर, सांगली, जत, औंढी, आटपाडी, मंगळवेढा, लेंडवेचिंचाळे, आरग-बेडग, रेवनाळ, मोहोळ, मरवडे, दिघंची, बनपुरी, करमाळा, माळशिरस, माढा या ठिकाणच्या सर्व आजी-माजी सैनिक संघटना आपल्या पदाधिकाऱ्यांसोबत उपस्थित झाल्या. वर्धापन दिनाचे प्रमुख पाहुणे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त लेफ्टनंट कर्नल सतेश दैवानराव हंगे साहेब आपल्या परिवारासोबत आले होते तसेच सूर्योदय ग्रुपचे अध्यक्ष मा. अनिल भाऊ इंगवले सर, मा.सचिन ज्वेलर्सचे मालक सचिन मिसाळ सर, संस्थापक, नेते किसान व वॉटर आर्मीचे मा. प्रफुल्ल कदम सर सांगोला विद्यामंदिर कॉलेजचे प्राचार्य मा. चारुदत्त जगताप सर, स्टेट बँक ऑफ इंडियाचे वाईस मॅनेजर मा. सादिक बागवान सर पेन्शनर शिक्षक संघाचे अध्यक्ष मा. वसंत दिघे गुरुजी, संस्थेचे वकील एडवोकेट ज्योती जाधव मॅडम, स्वस्तिक ज्वेलर्सचे मालक, संभाजी ब्रिगेडचे मा. अरविंद भाऊ केदार या सर्वांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन ज्यांनी केले ते म्हणजे संस्थेचे उपाध्यक्ष- सुभेदार मेजर रविकांत गणपत मराळ साहेब यांनी संस्थेचे प्रास्ताविक आपल्या धडाकेबाज अंदाज मध्ये करताना संस्थेची स्थापना, वैशिष्ट्ये, उद्दिष्टे, कार्यप्रणाली, लेखाजोखा आणि आत्तापर्यंत केलेली कामे आणि इथून पुढे करण्यात येणारी कामे तसेच सैनिकांच्या समस्या, अडीअडचणी कशाप्रकारे सांगलो तालुक्याच्या तहसीलदार साहेबांच्या मदतीने सोडवितो तसेच जिल्हा सैनिक बोर्ड लोकप्रतिनिधी, नगराध्यक्ष, पोलीस इन्स्पेक्टर भूमिलेखा ऑफिस, सेतू कार्यालय यांच्या मदतीने सोडवल्या जातात तसेच माजी सैनिका तर्फे प्रशासनास खास करके नगरपरिषद सांगोला यांना विनंती करण्यात आली की प्रशासनाच्या इमारतीत वीर जवान तुझे सलाम हे लिहिले जावे आणि वीर सैनिकांचा सन्मान वाढवावा. बगीचा नंबर ४७,चिंचोली रोड या ठिकाणी बनवण्यात आलेल्या शहीद स्मारकाचे उद्घाटन लवकरात लवकर करावे तसेच या ठिकाणी वार ट्रॉफी म्हणून लश्ररीी-७ रणगाडा आणण्यासाठी नगरपरिषदेने प्रयत्न करावेत, माजी सैनिकांच्या ऑफिस साठी बिगर भाडेतत्त्वावर गाळा उपलब्ध करून द्यावा तसेच सैनिक भवनाची मागणी, एउक्‍उडऊ उरपींशशप सुविधा यासाठी तालुक्याचे आमदार साहेब, माजी आमदार साहेब, तालुक्याचे खासदार साहेब, भाजपा जिल्हाध्यक्ष या सर्वांना सैनिकांतर्फे विनंती आहे की या सर्व कामासाठी आपण सर्वांनी लक्ष द्यावे आणि लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न करावे. याचवेळी माननीय प्रफुल्ल कदम सरांनी सांगोला भूषण या पुरस्काराची घोषणा केली आणि लिखित स्वरूपात पत्र सांगोला भूषण या पुरस्कारासाठी संस्थेस व रविकांत मराळ साहेब यांना हे पत्र देण्यात आले. सांगलीचे माजी सैनिक सतीश पाटील मेजर, स्टेट बँकेचे व्हाईस मॅनेजर सादिक भगवान सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच माजी सैनिकांना मार्गदर्शन केले तसेच अनिल भाऊ सर, अरविंद भाऊ केदार यांनी आजी माजी सैनिकांचे आपले मनोगत व्यक्त करताना भरभरून कौतुक केले. तसेच सचिन ज्वेलर्स चे मालक सचिन मिसाळ यांच्याकडून आलेल्या सर्व माजी सैनिकांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच जय जवान माजी सैनिक संस्थेतर्फे आलेल्या सर्व आजी माजी संघटनांचा तसेच सर्व मान्यवरांचा संस्थेतर्फे सन्मानचिन्ह म्हणून आकर्षक ट्रॉफी, शाल व गुलाबपुष्प पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर संस्थेचे तडफदार अध्यक्ष सिद्धेश्वर रामचंद्र पाटील मेजर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रम समाप्तीची घोषणा केली. संस्थेतर्फे येथेच्च मिष्ठान्न भोजनाची व्यवस्थापन संस्थेकडून करण्यात आली होती त्याचा पण सर्वांनी आस्वाद घेतला. भारत माता की जय, वंदे मातरम,जय हिंद, जय भारत, जय महाराष्ट्र, जय शिवराय.






हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ‘करावा विठ्ठल’च्या सुरेल अभंगांनी रसिक तल्लीन

## आकार पुणे निर्मित संगीत-नाट्य कलाकृतीने पंढरीच्या वारीच्या रंजक आठवणींना उजाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने दिनांक २०-०९-२०२६ रोजी आयोजित श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी ‘आकार’ पुणे निर्मित ‘करावा विठ्ठल’ या संगीत व नाट्य कलाकृतीने पंढरपूरकर रसिकांना मंत्रमुग्ध केले. पंढरीची वारी, वारकऱ्यांचे अनुभव, भक्तीभाव आणि सुरेल अभंग यांची सुंदर सांगड घालत कलाकारांनी विठ्ठल चरणी आपली कलासेवा अर्पण केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिर समितीचे सदस्य सद्गुरू श्री. भास्करगिरी महाराज, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच मान्यवर कलाकारांच्या हस्ते श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्व-लन करण्यात आले. यावेळी सहभागी सर्व कलाकारांचा मंदिर समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.




‘करावा विठ्ठल’ या कलाकृतीतून पंढरीच्या वारीतील रंजक कथा, वारकऱ्यांचा आनंद, वारीतील भक्तिभाव आणि विठ्ठलनामाचा गजर यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. संगीत, अभिनय, कथन आणि अभंग यांच्या सुरेल मिलाफातून कलाकारांनी रसिकांना वारीचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न केला.

या कार्यक्रमात आकार ग्रुपच्या १४ कलाकारांनी सहभाग घेतला. त्यामध्ये महेश पाटणकर, धनंजय वेर्णेकर, स्वाती रांजेकर, सविता पेशवे, यशश्री पुणेकर, रूपाली बापट, अनहिता रांजेकर तसेच मृदंग - अविनाश तिकोनकर, तबला - जितेंद्र पावगे, हार्मोनियम - माधवी करंदीकर आदी कलाकारांचा सहभाग होता.

तिसऱ्या दिवशी पंढरपूरातील कलारसिकांनी मोठ्या संख्येने उप-स्थित राहून या अविस्मरणीय संगीत मैफिलीचा आनंद घेतला.

पुढील २१, २२ व २३ सप्टेंबर रोजी महोत्सवात मान्यवर व ख्यातनाम गायक-गायिकांची गायनसेवा सादर होणार आहे. या संगीत महोत्सवा-चा कलारसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद घ्यावा, असे आवाहन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# यंदा पाऊस नाही; २०२७ मध्ये प्यायला पाणी मिळणार का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : यंदाच्या पावसाळ्यात अपे-क्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. पावसाने ओढ दिल्यामुळे विहिरी, कूपनलिका तसेच इतर जलस्रोतांवर परिणाम होण्याची शक्यता असून, आगामी उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची चिंता ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे.

## पावसाअभावी पाणीटंचाईची चिंता; ग्रामस्थांसमोर मोठा प्रश्न

महाराष्ट्रात अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने शासनाने संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तपासताना सप्टेंबरअखेरचे पर्जन्यमान आणि त्यानंतरची भूजल पातळी महत्त्वा-ची मानली जाते.

यंदा पुरेसा पाऊस न झाल्यास भूजलपातळी आणखी खालावण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता पाणी जपून वापरले नाही, तर २०२७ मध्ये प्यायला पाणी मिळणार का? असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, राज्याच्या काही भागांत पावसाची शक्यता अद्याप कायम असून २१ व २२ सप्टेंबरला काही जिल्ह्यांना पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. त्यामुळे उर्वरित पावसाकडे शेतकरी व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाने आतापासूनच गावनिहाय पाणीसाठ्याचे नियोजन, उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन आणि संभाव्य टंचाईग्रस्त भागांचा आढावा घेण्याची गरज आहे. भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये यासाठी जलसंधारणाच्या उपाययोजनांना गती देण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

# कळंब तालुका फोटोग्राफर असोसिएशनची नवीन कार्यकारिणी जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुका फोटोग्राफर असोसिएशनच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. फोटोग्राफर बांधवांच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी पांडुरंग गव्हाणे, उपाध्यक्षपदी प्रीतम डिकले, सचिवपदी संतोष कोठावळे, कोषाध्यक्षपदी दयानंद शिंदे, संघटकपदी आर. आर. गर्जे तर सल्लागारपदी रणजित मडके यांची निवड करण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ फोटोग्राफर शिंदे मामा, बालाजी बाहेती, गजानन तोडकर, हरीश पवार, अश्रूबा शेवते, श्रीकांत खापे, संतोष घुले, हज्जू अरब, वसीम सय्यद, सतीश अडसूळ तसेच कळंब तालुका फोटोग्राफर असोसिएशनचे सर्व सदस्य फोटोग्राफर उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून तालुक्यातील फोटोग्राफर बांधवांच्या विविध प्रश्नांवर काम करण्यासोबतच व्यवसायातील नवीन तंत्रज्ञान, प्रशिक्षण, एकजूट आणि पर-स्पर सहकार्याला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नवीन कार्यकारिणीचे फोटोग्राफर बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# वृद्ध माता पितांच्या मुखांमध्ये दोन घास भरवणे खरोखरच श्रेष्ठ दान आहे : नितीनजी करंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : सध्या जीवनामध्ये ईश्वरानंतर जे आपणास प्रिय असतात ते म्हणजे माता पिता ईश्वरानंतर आपण आपल्या मातापित्यांना ईश्वरासारखंच प्रेम करतो अशा वृद्ध माता पित्यांच्या मुखामध्ये दोन घास भरवणे हे दान खरोखरच श्रेष्ठ दान आहे आशा प्रकारचे विचार महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूर शहर उपाध्यक्ष निती-नजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष सन्माननीय राजेंद्रजी कोरके-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कुठलीही डिजिटल जाहिरात कोणताही सत्कार इतर कुठलाही खर्च फाटा देऊन गोप-ाळपूर येथील वृद्धाश्रमातील मातापित्यांना अन्नदानाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष राजेंद्र कोरके - पाटील यांचा सत्कार व्यवस्थापक धनंजय राक्षे यांनी केला तर त्यांचे औक्षण वृद्ध माता यशोदा जाधव यांनी केले त्यांच्या वाढदिवसाच्या प्रित्यर्थ त्यांना आशीर्वादाचे गीत वृद्ध सुनंदा छत्रे माता यांनी सादर केले या कार्यक्रमासाठी संघटनेचे शंकर कदम संतोष मोरे सुनील अधटराव राजेश बादले- पाटील वकील विक्रम कदम केंद्रे महाराज मठाचे व्यवस्थापक खामकर महाराज अतुल मोरे कुमार कोरे प्रमोद भोसले महेश कदम संजय यादव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते यानंतर सर्व वृद्ध माता-पितांना अन्नदानाचे वाटप करण्यात आले त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा सत्कार संस्थेच्या वतीने करण्यात आला आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

# रोटरी क्लब पंढरपूर तर्फे मुख्याध्यापक काशिनाथ गोगाव यांचा ’नेशन बिल्डर अवॉर्ड’ ने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर शिक्षण क्षेत्रात दिल्या तीन दशकापासून सातत्याने कार्यरत असलेली अक्षरनंदन प्राथमिक विद्यामंदिर, इसबावी येथील मुख्याध्यापक श्री काशिनाथ गोगाव यांचा रोटरी क्लब ऑफ पंढरपूर यांच्यावतीने नेशन बिल्डर अवॉर्ड प्रदान करून गौरव करण्यात आला.

शक्षक दिन हा देशाच्या शैक्षणिक वाटचालीत शिक्षकांच्या योगदान बद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त साजरा होण-ारा हा दिवस शिक्षकांच्या ज्ञानदानाच्या कार्याची आणि समाज निर्मितीतील त्यांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेची आठवण करून देतो अशा कर्तुत्वान शिक्षकांच्या कार्यांचा सन्मान हा समाजासाठी प्रेरणादायी ठरतो श्री काशिनाथ गोगाव यांनी आपल्या प्रदीर्घ सेवा काळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबर त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला व शाळा विद्यार्थी पालक आणि समाज यांच्यातील समाज निर्मितीतून त्यांच्या महत्वपूर्ण भूमिकेची आठवण करून देतो असेच कर्तुत्वान शिक्षकांची कार्याचा समान हा समाजासाठी प्रेरणादायी ठरतो.

श्री काशिनाथ गोगाव यांनी आपल्या प्रत्येक सेवा काळात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबर त्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला शाळा विद्यार्थी पालक यांच्यातून समन्वयातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अधिक प्रभावी करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहे. मुख्याध्यापक म्हणून त्यांनी शैक्षणिक वातावरण निर्माण केले. शिक्षकांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना गीताला प्राधान्य देणे या जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्या,

री क्लब ऑफ पंढरपूरच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे रोटरी क्लबचे अध्यक्ष श्री मिलिंद वंजारी सचिव श्री भारत ढोबळे श्री विशंभर पाटील श्री इंद्रजीत परिचारक तसेच सिंहगड कॉलेज ऑफ इंजीनियरिंगची प्राचार्य माननीय श्री कैलास कारंडे यांच्यासह रोटरी क्लब ची पदाधिकारी सदस्य उप-स्थित होते.




स्वीकारताना श्री काशिनाथ गोकुळ यांच्या समिती सूर्यकांत देसाई सर श्री महेश भोसले सर श्री सतीश चंद्रराव तसेच श्याम गोगाव सर व कुटुंबई उपस्थित होते.

या ३० वर्षाचा प्रतिनिधी शैक्षणिक सेवेला मिळालेला हा सन्मान यांच्या कार्याची दखल घेणार असून शिक्षक म्हणून समाजाच्या भावी पिढीच्या घडणीत योगदान देणारा सर्व शिक्षणासाठी तो प्रेरणादायी ठरला आहे.

ज्ञानदानातून संस्कार आणि संस्कारातून सक्षम समाज घडविणे हे शिक्षकाचे खरे कार्य आहे.

# तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत कल्याणशेट्टी शाळा अव्वल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये कल्याणशेट्टी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

नुकत्याच झालेल्या तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत १७ वर्षेखालील मुलींच्या गटात कु. गायत्री धम्मे, १४ वर्षेखालील मुलांच्या गटात आदर्श डांगे तर १४ वर्षेखालील मुलींच्या गटात कु. मृणाली वाघदारे यांनी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.

याशिवाय १९ वर्षेखा-लील क्रिकेट स्पर्धेत मुलांच्या संघाने तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला.

तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेतील यशामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध क्रीडा उपक्रमांना बळ आले आहे. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडा शिक्षक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**दुष्काळात मळमंडा खाल्ल्याचा कटू अनुभव**

**तत्वाला जागणारी, माणुसकीचा झरा असलेली पिढी नामशेष होण्याच्या मार्गावर**

# ८० रुपये तोळं सोने पाहिलेली आणि एक आणा कप चहा पिलेली पिढी !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : ८० रुपये तोळे तेही २४ कॅरेट सोने पाहिलेली आणि एक आणा कप चहा पाहिलेली पिढी आजही अक्कलकोट शहर आणि तालुक्यातील ग्रामीण भागात आहे. १९७२ -७३ च्या दुष्काळात जनावरे खा-णारे मळमंडा खाण्याचा कटू अनुभवी त्यांच्या ठाई आहे. जुना काळ सोन्याचा होता , माणसं सोन्यासारखी प्रेमळ आणि मायाळू होती. हा संदेश आजच्या नव्या पिढीला प्रेरणादायी ठरतो आहे.




अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथील सेवानिवृत्त जिल्हा परिषद शिक्षक चनबसप्पा ईश्वरप्पा चितली (वय ८४ ) तसेच नागनळ्ळी येथील दस्तगीर हुसेनी हन्नुरे ( वय ७५ ) यांची अक्कलकोट शहरातील सर्जेराव जाधव सार्वजनिक वाचनालयात भेट झाली. वृत्तपत्र वाचताना सहजच चनबसप्पा चितली गुरुजी यांच्याकडे लक्ष गेले. तसेच दस्तगीर हुसेनी हन्नूरे हे उपस्थित होते .त्या दोन्ही जुन्या जाणत्यांना माहिती द्वारे बोल-के केले. आज ज्यांना आपण वयोवृद्ध म्हणतो ती माणसं आजच्या तरुणांना लाजवेल असे जीवन जगत आहेत. वागदरी येथील चनबसप्पा ईश्वराप्पा चितली गुरुजी हे जिल्हा परिषद शाळेत बत्तीस वर्षे सेवा करून निवृत्त झाले आहेत. त्यांचे आज वय ८४ वर्षे इतके आहे. चितली गुरुजींनी जुन्या आठवणी सांगताना ८० रुपये २४ कॅरेट तोळे सोने असलेले दिवस पाहिल्याचे सांगितले. तसेच एक रुपयाला सहा लिटर दूध विकल्याचे सांगितले. एक आणा तसेच पाच पैसे कप चहा पिल्याचे म्हणा-ले, चितली गुरुजींचे १९५८ साली सातवीपर्यंत शिक्षण झाले आहे. चितली यांचे वय आज ८४ वर्ष इतके असून ते दररोज पहाटे साडेचार वाजता उठून फिरणे , योगासन करणे आज ही करतात. तसेच स्वतः चे कपडे स्वतः धुणे कपडे टार्च करणे हे स्वतः करतात . १९७२ -७३ साली पडलेल्या भीषण दुष्काळात जनावरांना खाऊ घालण्यात येणारे मळमंडा खाल्ल्याचे सांगितले. जुन्या काळी पाऊस मुबलक असल्याने शेंगा मोठ्या प्रमाणात पिकत असल्याचे चितली गुरुजी यांनी माहिती दिली. भारताचे माजी पंतप्रधान पंडित जवाहरल-ाल नेहरू , माजी पंतप्रधान इंदिरा गांधी , महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना पाहण्याचे भाग्य लाभल्याचे चितली गुरुजींनी सांगितले. चितली गुरुजी हे सध्या वागदरी येथील श्री परमेश्वर देवस्थान मध्ये कुस्ती पंच म्हणून कमिटीमध्ये कार्य करत आहेत.

येथील दस्तगीर हुसेनी हनुरे यांनीही जुन्या काळातील माहिती सांगितली. १९६३ सालच्या दुष्काळामध्ये तसेच १९७२ सालच्या दुष्काळात मळमंडा खाल्ल्याची आठवण सांगितली. एक आणा कप चहा त्याकाळी मिळत होता. १९७२ साली आचेगाव (दक्षिण सोलापूर ) येथे भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आल्या होत्या .त्यांना व पंडित जवाहरलाल नेहरू , लालबहादूर शास्त्री यांना पाहण्याचा योग आल्याचे दस्तगीर हन्नूरे यांनी सांगितले. पीडब्ल्यूडी विभागात सेवा बजावून दस्तगीर हन्नुरे हे निवृत्त झाले आहेत. जुनं ते सोनं या म्हणीप्रमाणे जुना काळ हा खरंच सुख समृद्धीने नटलेला होता असे म्हणण्याची वेळ आली आहे. आजचा काळ हा जरी आधुनिक, यांत्रिकीकरणाचा तसेच चौफर विकासाचा जरी असला तरी प्रेम, माया, ममता असलेली माणसं नाहीशी होत असल्याचे चनबसप्पा चितली व दस्तगीर हन्नुरे याने सांगितले. तत्वाला जागणारी , माणुसकीचा झरा असलेली पिढी आता नाहीशी होत असून आताच्या नव्या पिढीला जुन्या जाणत्या लोकांचा आदर्श घेऊनच मार्गक्रमण करावी लागणार आहे. तरच सामाजिक शांती, विकासाचे व्हिजन, नव्या पिढीत वैचारिक समृद्धी येण्यास मदत होणार आहे.

- स्वामीराव गायकवाड, पत्रकार, संपादक, अक्कलकोट जि. सोलापूर.

# दुष्काळी परिस्थिती गंभीर आ.अभिजीत पाटलांनी टंचाई बैठकीत उठवला आवाज



## सोलापूर येथील नियोजन भवनात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यासह माढा विधानसभा मतदारसंघावर दुष्काळाचे सावट अधिक गडद होत असून पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी गंभीर संकटात सापडला आहे. शेतातील उभी पिके पाण्याअभावी करपू लागली असून अनेक गाव-वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर 'नियम-अटींच्या कचाट्यात शेतकऱ्यांना अडकवू नका; तातडीने पाणी उपलब्ध करून द्या,' अशी ठाम मागणी आमदार अभिजीत आबा पाटील यांनी केली. त्यास पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांनी सकारात्मक आश्वासन दिले.

सोलापूर येथील नियोजन भवनात पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत टंचाई आढावा बैठक पार पडली. यावेळी माढा मतदारसंघासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात निर्माण होत असलेल्या टंचाईच्या परिस्थितीकडे आ. अभिजित पाटील यांनी शासनाचे लक्ष वेधले. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेकांच्या घरांचेही नुकसान झाले असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला. त्या संकटातून सावरण्याची संधी मिळण्यापूर्वीच यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांवर पुन्हा संकट कोसळले आहे.

सध्या अनेक भागांत पिकांना पाण्याची नितांत गरज असताना उपलब्ध पाणीसाठे मर्यादित होत आहेत. शेतातील उभी पिके वाचविण्यासाठी शेतकरी धडपडत असून पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दुसरीकडे गाव-वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता भासू लागली आहे. जनावरांसाठी चारा आणि पाण्याची उपलब्धता हा देखील गंभीर प्रश्न बनत चालला आहे.

टंचाईच्या परिस्थितीचा आढावा घेताना केवळ बैठका, पंचनामे, अहवाल आणि कागदावरील आकडे यावर समाधान न मानता प्रशासनाने प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन परिस्थिती पाहण्याची गरज असल्याचे आ. अभिजित पाटील यांनी स्पष्ट केले.

> **शेतकऱ्यांसमोर आज पीक वाचविण्याचे मोठे संकट उभे आहे. पिके करपत आहेत, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे. त्यामुळे बैठका, पंचनामे, अहवाल आणि कागदावरील आकडे पुरेसे नाहीत. प्रत्यक्ष शेताच्या बांधावरची परिस्थिती पाहून तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना नियम-अटी लावून अडवू नका; त्यांना पाणी द्या आणि त्यांचे पीक वाचवा.**
>
> **-आमदार अभिजीत पाटील,**
> **माढा विधानसभा**

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर केवळ चर्चा करून वेळकाढूपणा न करता तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी आ. पाटील यांनी बैठकीत केली. पिकांना आवश्यक पाणी, गाव-वाड्यांतील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता याबाबत प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीच्या संकटातून आर्थिकदृष्ट्या सावरण्यापूर्वीच यंदाच्या अपुऱ्या पावसाने शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत देताना प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला नियम-अटींच्या फेऱ्यात न अडकवता शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी ठाम भूमिका आ. अभिजित पाटील यांनी मांडली. सोलापूर जिल्ह्यातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाकडून आता कोणत्या उपाययोजना केल्या जातात आणि शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नावर कितपत तातडीने निर्णय घेतला जातो, याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# अक्कलकोट भूमिअभिलेख कार्यालयातील प्रलंबित मोजणी प्रकरणांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांची नजर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तालुका प्रतिनिधी/अक्कलकोट : अक्कलकोट उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील प्रलंबित मोजणी प्रकरणांच्या कामकाजावर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली असून, प्रकरणे निकाली काढण्यासाठी तातडीने नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सोलापूर मुगुटराव मगर हे गुरुवार, दि. २४ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता अक्कलकोट येथील कार्यालयास भेट देऊन प्रलंबित मोजणी प्रकरणांचा आढावा घेणार आहेत.

**२४ सप्टेंबरला जिल्हा अधीक्षकांकडून कार्यालयाचा आढावा; अर्जदारांची निवेदनेही स्वीकारणार**

जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून अक्कलकोटच्या उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाला याबाबत तातडीचे पत्र देण्यात आले आहे. पुणे प्रदेशाचे उपसंचालक भूमी अभिलेख हे दर सोमवारी प्रलंबित भूमापन मोजणी प्रकरणांचा आढावा घेत आहेत. या आढाव्यात अक्कलकोट कार्यालयाची मोजणी प्रकरणांमधील प्रगती अत्यंत निराशाजनक असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

एक वर्षापेक्षा अधिक तसेच सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ प्रलंबित असलेल्या मोजणी प्रकरणांबाबत नियोजन करण्याच्या सूचना यापूर्वीही देण्यात आल्या होत्या. मात्र, अद्याप अपेक्षित नियोजन करण्यात आले नसल्याने ही बाब गंभीर असल्याचे जिल्हा अधीक्षकांनी पत्रात नमूद केले आहे.


**अर्जदारांची निवेदने स्वीकारणार**

२४ सप्टेंबर रोजीच्या आढावा बैठकीत कार्यालयातील प्रलंबित मोजणी प्रकरणांच्या नियोजनाची पाहणी करण्यात येणार आहे. तसेच भूमिअभिलेख कार्यालयाच्या कामकाजाबाबत जनतेकडून व अर्जदारांकडून निवेदनेही स्वीकारण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रलंबित मोजणी प्रकरणांमुळे अडचणी येत असलेल्या नागरिकांना आपली बाजू मांडण्याची संधी मिळणार आहे.

दरम्यान, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी नियोजित मोजणीची कामे पूर्ण करून आढावा बैठकीस उपस्थित राहावे, अशा सूचना देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# हार-फुलांऐवजी वही-पेन; गौरी मातेच्या दर्शनाला भाविकांची सामाजिक बांधिलकी

**सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांची सहा वर्षांची सामाजिक परंपरा**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : गौरी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी हार-फुले, मोदक किंवा पेढे न आणता शैक्षणिक साहित्य आणावे, असे आगळेवेगळे आवाहन भिवंडी तालुक्यातील आतकोली येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी केले होते. त्यांच्या या आवाहनाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य भेट देऊन सामाजिक उपक्रमाला हातभार लावला. गौरी मातेच्या दर्शनासाठी येताना भाविकांनी वही, पेन, पेन्सिल, खोडरबर, चित्रकलेच्या वह्या आदी विद्यार्थ्यांच्या उपयोगी साहित्य आणावे, असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार अनेक भाविकांनी भक्तिभावासोबत सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक साहित्य अर्पण केले. त्यामुळे गौरी मातेच्या उत्सवाला सामाजिक उपक्रमाची जोड मिळाली.

गेल्या सहा वर्षांपासून भोईर कुटुंबीयांकडून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात येत असून, परिसरातील नागरिकांकडूनही त्याचे कौतुक होत आहे.

नागरिकांच्या सहकार्याने जमा झालेले शैक्षणिक साहित्य लवकरच एखाद्या दुर्गम भागातील शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी दिली. 'गौरी मातेच्या चरणी अर्पण होणाऱ्या भक्तीला विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जोड मिळावी', या उद्देशाने सुरू असलेल्या या उपक्रमातून धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक जबाबदारीचा सुंदर संदेश समाजापुढे ठेवण्यात आला आहे.

# महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाच्या प्रभारी सभापतीपदी संतोष सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




लातूर प्रतिनिधी/अमर जाधव पुणे : महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ, पुणेचे सभापती बाळासाहेब नाहटा यांच्याविरोधातील अविश्वास ठराव सर्वानुमते मंजूर झाल्यानंतर सभापतीपद रिक्त झाले आहे. या रिक्त झालेल्या पदाचा प्रभारी सभापती म्हणून संघाचे उपसभापती संतोष सोमवंशी यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला आहे.

संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत अविश्वास ठरावावर चर्चा होऊन तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानंतर सभापतीपदाची जबाबदारी उपसभापती संतोष सोमवंशी यांच्याकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला.

पदभार स्वीकारल्यानंतर सोमवंशी यांनी बाजार समित्यांच्या माध्यमातून शेतकरी, व्यापारी व संबंधित घटकांच्या हितासाठी संघाचे काम काज अधिक प्रभावीपणे पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला. राज्यातील बाजार समित्यांच्या विविध प्रश्नांवर समन्वय साधून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यास प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संतोष सोमवंशी यांची प्रभारी सभापतीपदी नियुक्ती झाल्याबद्दल बाजार समिती क्षेत्रातील पदाधिकारी, संचालक व सहकार क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा, शिस्त आणि सातत्य हाच यशाचा खरा मार्ग : सहा.पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात यश संपादन करण्यासाठी प्रेरणा, शिस्त आणि सातत्य या तीन सूत्रांचा अंगीकार करणे अत्यंत आवश्यक आहे. हे तीन अत्यंत महत्त्वाचे स्तंभ आहेत. प्रेरणा तुम्हाला कामाची सुरुवात करण्यास मदत करते, शिस्त तुम्हाला योग्य मार्गावर ठेवते आणि सातत्य तुम्हाला अंतिम ध्येयापर्यंत पोहोचवते असे प्रतिपादन सहा पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी केले.

गणेशोत्सवानिमित्त आयोजित लोकसंवाद २०२६ उपक्रमांतर्गत चिंचणी (ता.पंढरपूर) येथील वरदायिनी गणेशोत्सव मंडळ येथे शासनाकडून विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधाबाबत श्री. डगळे यांनी संवाद साधला

यावेळी सहा. पोलीस अधिक्षक डगळे म्हणाले, आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ बुद्धिमत्ता पुरेशी नसून, या तीन स्तंभांच्या बळावरच विद्यार्थी आपले ध्येय साध्य करू शकतात, प्रेरणा ही विद्यार्थ्याला एखाद्या कामाची किंवा अभ्यासाची सुरुवात करण्यास मदत करते. ती अंतःकरणातून येणे गरजेचे आहे. मात्र, केवळ प्रेरणेवर विसंबून चालत नाही; त्यासाठी शिस्तीची जोड असावी लागते. शिस्त विद्यार्थ्याला योग्य मार्गावर ठेवते, वेळेचे नियोजन शिकवते आणि अभ्यासातील लक्ष विचलित होऊ देत नाही. प्रेरणेने सुरू केलेले काम शिस्तीने पुढे नेले तरीही अंतिम यशासाठी सातत्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. सातत्यच विद्यार्थ्याला त्याच्या अंतिम ध्येयापर्यंत पोहोचवते.विद्यार्थ्यांनी केवळ गुणांमागे न धावता या तीन मूल्यांना आपल्या दैनंदिन जीवनाचा हिस्सा बनवावे, जेणेकरून ते एक आदर्श आणि यशस्वी नागरिक बनू शकतील, असा संदेश या प्रसंगी देण्यात आला.



चिंचणी या पुर्नवसीत गावातील नागरिकांनी गावाच्या विकासात्मक कामात सातत्य राखल्याने याठिकाणच्या नागरिकांना तसेच बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. चिंचणी गावाने केलेल्या विकासामुळे राज्य शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त झाले असल्याचे गौरवोध्दार देखील त्यांनी काढले.

यावेळी कार्यक्रमास मोहन अनपट,शशिकांत सावंत, चंद्रकांत पवार, शरद सावंत तसेच चिंचणी ग्रामस्थ व विद्यार्थि उपस्थित होते.

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उपक्रम**

# कल्याणशेट्टी महाविद्यालयात रेड रिबन क्लबची स्थापना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : कल्याणशेट्टी महाविद्यालयामध्ये एच आय व्ही तथा एड्स विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी, सुरक्षित व आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने रेड रिबीन क्लब ची स्थापना करण्यात आली.

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेड रिबन क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, पोस्टर प्रदर्शन, घोषवाक्य स्पर्धा, रॅली, पथनाट्य, प्रश्नमंजुषा अशा विविध उपक्रमाद्वारे एडस् जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे.

मारुती धर्मसाले म्हणाले की, महाविद्यालयीन स्तरावर रेड रिबन क्लब हा 'युवकांच्या माध्यमातून समाजजागृती' घडवून आणणारा प्रभावी उपक्रम आहे.

राघवेंद्र करजगीकर म्हणाले की, एड्स प्रतिबंधाबरोबरच आरोग्य, सुरक्षितता, समानता आणि सामाजिक संवेदनशीलता यांविषयी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यास रेड रिबन क्लब महत्त्वाची भूमिका बजावतो.

संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, पुनम कोकळगी, रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी उपक्रमाबद्दल कौतुक केले आहे.

**रेड रिबीन क्लब पदाधिकारी जनजागृती करणार**

**राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकाची रेड रिबीन क्लब चे पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे ते एच आय व्ही संसर्ग व एड्स सारख्या भयानक रोगाबद्दल शहरात देखील जनजागृती करणार आहेत असे प्रतिपादन कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार यांनी केले.**

# कळंब विधीज्ञ मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. आनंद फाटक उपाध्यक्षपदी ॲड. अमर पायाळ; महिला उपाध्यक्षपदी ॲड. किरण गालफाडे

**कळंब विधीज्ञ मंडळ निवडणूक २०२६-२७**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : कळंब विधीज्ञ मंडळाच्या सन २०२६-२७ या वर्षासाठीची निवडणूक आज उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या निवडणुकीत अध्यक्षपदी ड. आनंद केशवराव फाटक यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी ड. अमर पायाळ, तर महिला उपाध्यक्षपदी ड. किरण गालफाडे यांची निवड करण्यात आली.

याशिवाय सचिवपदी ड. कुणाल डिकले, तर कोषाध्यक्षपदी ड. दत्तात्रय कवडे यांची निवड झाली. कळंब विधीज्ञ मंडळाच्या नूतन कार्यकारिणीची निवड झाल्यानंतर विधीज्ञ मंडळींनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.



या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड. भगीरथ वाघमोडे यांनी काम पाहिले. निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी त्यांनी विशेष भूमिका बजावली.

नूतन कार्यकारिणीच्या माध्यमातून विधीज्ञ मंडळाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासह सदस्यांच्या हितासाठी प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे कळंबच्या न्यायक्षेत्रात नव्या कार्यकारिणीकडून अपेक्षा व्यक्त होत आहेत.